जानेवारी २००४

# २००३ -२००४ हे सहकार वर्ष संपण्यासाठी 2 ½ महिने बाकी

पतसंस्थांना २००३ -२००४ हे सहकार वर्ष संपण्यासाठी 2 ½ महिने बाकी आहेत. व ह्या कालावधीत अनेक महत्वाच्या गोष्टी करणे क्रमपात्र आहेत.

१) **प्रशिक्षण** :- पतसंस्थांचे पदाधिकारी व संचालक हयांनी प्रशिक्षित होणे आवश्यक आहे. ज्यांनी प्रशिक्षण घेवून अधिकृत तसे प्रमाणपत्र घेतले नसेल तर त्वरीत प्रशिक्षणासाठी 'महाराष्ट्र राज्य सहकारी संघ,लि.' ५,बी.जे. रोड, पुणे - ४११ ००१. येथे संपर्क साधावा.

महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे संपूर्ण राज्यात प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी जिल्हा सहकारी बोर्ड, विभागीय सहकारी मंडळ, १३ प्रशिक्षण केंद्रे , नागपूर व पुणे येथे प्रत्येकी एक कॉलेज, तसेच राज्यात अशी प्रशिक्षण घेण्यासाठी सर्व सुसज्ज यंत्रणेसह अधिकृत व कायदेशीर सुविधा उपलब्ध आहे. त्वरीत संपर्क साधल्यास प्रश्न सुटू शकेल.

२) **थकबाकी** :- पतसंस्थांची थकबाकी कमी करणे अत्यंत आवश्यक व गरजेचे आहे. महाराष्ट्र सहकारी कायदा कलम १०१ अन्वये दावे त्वरीत दाखल करावेत. त्या अगोदर संबंधीत कर्जदार व जामीनदार ह्यांना नोटीसा देणे आवश्यक आहे. ३ महिन्यापेक्षा जास्त थकीत हप्ते झाल्यास त्वरीत नोटीस पाठवू शकता. व कलम १०१ अन्वये दाखल करु शकता. एवढेच नव्हे तर हे करणे सहकार कायद्यान्वये क्रमप्राप्तच आहे. हे कृपया टाळू नये. तसेच सर्वच थकबाकीदारांवर कारवाई करावी. भेदभाव करु नये.

३) **व्याजदार** :- पतसंस्थांनी कर्जावर जास्तीत जास्त १६ टक्के एवढाच व्याजदर आकारणे बंधनकारक आहे. १६ टक्के किंवा त्यापेक्षा कमी सुध्दा व्याजदर आकारु शकता. (उपविधीप्रमाणे)तसेच पतसंस्थांनी ठेवीदारांना जास्तीत जास्त १३ टक्के एवढाच व्याजदर देणे बंधनकारक आहे.किंवा त्यापेक्षा कमी सुध्दा ठेवीवर व्याज देऊ शकता. (उपविधीप्रमाणे)परंतु दोन्ही व्याजदरात सर्वांना सारखाच नियम असणे आवश्यक आहे.

४) **राखीव निधीची गुंतवणुक** :- पतसंस्थानी राखीव निधी आपापल्या ''जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत स्वतंत्ररित्या गुंतवणूक करणे बंधनकारक आहे.

५) **भाग धारणेचे मर्यादा** :- पतसंस्थांनी असुरक्षीत कर्जदारांकडून ५ ते १० टक्के व सुरक्षीत कर्जदारांकडून २.५ ते ५ टक्के भागाएवढीच भागापोटी रक्कम स्विकारावी.

६) **तरलता (Liquidity)** :- पतसंस्थांनी एकूण सर्व प्रकारच्या ठेवींच्या २०टक्के रक्कम तरलता म्हणून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत किंवा शासकीय कर्ज रोख्यात गुंतवावी. अन्यत्र गुंतवु नये. अन्यथा ठेवी असुरक्षीत होवून पतसंस्था अडचणीत येवू शकतात. पर्यायाने ठेवीदारांच्या ठेवी पतर वेळेवर करणे

शक्य होणार नाही. व कायद्याचे संरक्षण मिळणार नाही.

७) **कार्यक्षेत्रात वाढ :**- पतसंस्थाना कार्यक्षेत्रात वाढ करुन घ्यायची असेल तर शासकीय जी.आर नुसारच करुन घ्यावी. खास बाब म्हणून कार्यक्षेत्र वाढवून घेण्याच्या मोहात पडू नये. व तसे करुन देणाऱ्या दलालंपासून सावध रहावे. कार्यक्षेत्रात वाढ ह्या संकल्पनेतून अनेक अनिष्ट व अप्रिय बाबींशी तडजोड बिलकुल करु नये. जे सहजा सहजी व नियमात बसेल तेवढेच कार्यक्षेत्र वाढवून घेण्यासाठी प्रस्ताव ३१ मार्च २००४ नंतरच्या वार्षिक सभेत मंजूरी घ्यावी.

८) **कर्जाची मुदत :**- पतसंस्थांनी अल्पमुदत कर्ज म्हणजे १ वर्षापर्यंत व मध्यम मुदत म्हणजे ७ वर्षापर्यंत कर्जाचे वाटप करु शकतात.पतसंस्थाकडे असलेल्या ठेवींचा कालावधी लक्षात घ्यावा.

९) **शिल्लकः**- 2 ½ महिन्यात वरील महत्वाच्या गोष्टींचे नियोजन करीत त्वरीत पावले उचलावी.

आपल्या सर्वांना २००४ या नुतन वर्षाच्या शुभेच्छा देत असतानाच हे सहकाराचे आर्थिक वर्ष सुध्दा आत्मविश्वासाचे,संस्थेच्या स्थिरतेचे व आर्थिक मजबुतीचे जाण्यासाठी शुभ चिंतीतो.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**